# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
# (पूर्वीचे पुणे विद्यापीठ), महाराष्ट्र

## शोध समिती, कुलगुरूच्या पदासाठी अर्ज मागवित आहे.

महाराष्ट्र शासनाने १९४८ मध्ये स्थापन केलेले सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे, उच्च शिक्षणाच्या मुक्त व्यवस्थेअंतर्गत आधुनिक संसूचना तंत्रज्ञानाचा वापर करुन पदविका, पदवी व पदव्युत्तर स्तरावर तांत्रिक, व्यावसायिक, व्यवसायकेंद्रीत आणि प्रागतिक शैक्षणिक अध्ययनक्रमांचे उच्च शिक्षण देणारी एक परिसंस्था आहे. या विद्यापीठातून ६४६ संलग्न महाविद्यालये, २३४ मान्यताप्राप्त परिसंस्था व ७० संशोधन परिसंस्था यांच्यामार्फत सुमारे ७ लाख विद्यार्थ्यांना २७१ पेक्षा अधिक पाठ्यक्रमांचे शिक्षण दिले जाते. या विद्यापीठ परिक्षेत्रामध्ये संशोधनाला प्रेरक असे वातावरण असून संशोधनासाठी अधिक पसंती मिळणा-या विद्यापीठांपैकी हे एक विद्यापीठ आहे. या विद्यापीठामध्ये विदेशी विद्यार्थ्यांची उपस्थितीदेखील लक्षणीय आहे. विद्यापीठाविषयीचे अधिक तपशील www.unipune.ac.in या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर पाहता येतील.

विद्यापीठाचे कुलपती आणि महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांनी विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी योग्य व्यक्तींच्या नावांची शिफारस करण्यासाठी शोध समिती घटित केली आहे. या समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश आहे :-

१. डॉ. अनिल काकोडकर, अध्यक्ष, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, महाराष्ट्र शासन, (अध्यक्ष)
२. प्रा. उदयकुमार आर. यरागट्टी, संचालक, मालवीय राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, जयपूर (सदस्य) आणि
३. श्री. भूषण गगराणी, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई, (सदस्य)

उपरोक्त शोध समिती ही आता उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, यांनी आपल्या दिनांक २७ मे, २००९ च्या आदेशाद्वारे विहित केल्याप्रमाणे, कुलगुरू या पदासाठीच्या अटींची पूर्तता करणा-या आणि हे आव्हानात्मक कार्य स्वीकारण्यास इच्छुक असणा-या विख्यात शिक्षणतज्ज्ञांकडून अर्ज / नामनिर्देशन पत्रे मागवित आहे. आवश्यक त्या अर्हता व अनुभव, इष्ट अनुभव आणि अपेक्षित कौशल्ये व क्षमता तसेच अर्जाचा नमुना यासंबंधातील आवश्यक ते तपशील www.unipune.ac.in या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दिलेले आहेत. कुलगुरू म्हणून नियुक्त होणारी व्यक्ती सेवा कराराच्या अटी व शर्ती यांच्या अधीन असेल आणि ज्या दिनांकास तो / ती त्याच्या / तिच्या पदाचा कार्यभार स्वीकारील त्या दिनांकापासून पाच वर्षाच्या कालावधीसाठी, किंवा त्याच्या / तिच्या वयाची पासष्ट वर्षे पूर्ण होईपर्यंत, यांपैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत, ते पद धारण करील. तो / ती पुनर्नियुक्तीसाठी पात्र असणार नाही.

अटींची पूर्तता करणा-या इच्छुक व्यक्तींना, त्याच्या / तिच्या उमेदवारीच्या समर्थनार्थ असणारी दोन पानी माहिती, विद्यापीठाबद्दलचा भविष्यवेधी दृष्टीकोन असणारी दोन पानी माहिती आणि त्याच्या / तिच्या कामाशी सुपरिचित असलेल्या तीन विख्यात व्यक्तींची नावे व संपर्काचे तपशील यांसह संशोधन, अध्यापनविषयक व प्रशासकीय कामगिरी स्पष्टपणे विशद करणारे विहित नमुन्यातील सविस्तर स्वपरिचयपत्र देऊन अर्ज करता येईल.

परिसंस्थांनादेखील योग्य उमेदवारांचे नामनिर्देशन करता येईल.

शोध समितीने, **श्री. विशाल जडी,** डॉक्टर अनिल काकोडकर यांचे कार्यालय, ७ वा मजला, मध्यवर्ती संकुल, भाभा अणुसंशोधन केंद्र, ट्रॉम्बे, मुंबई ï ४०००८५ यांची **प्रमुख अधिकारी** म्हणून नेमणूक केली आहे. (ई-मेल : vishalj74@yahoo.com दूरध्वनी क्रमांक 022-25505210, (कार्यालय), 09892281603 (भ्रमणध्वनी) (कार्यालयीन वेळेनंतर)

**अर्ज किंवा नामनिर्देशन पत्रे प्रमुख अधिका-याकडे दि. १० एप्रिल, २०१७ रोजी किंवा त्यापूर्वी पोहोचतील अशा रितीने पाठवावीत.**

आवश्यकता भासल्यास, निवड यादीत नाव असलेल्या उमेदवारांना शोध समितीबरोबर परस्पर संवादासाठी (interaction) बोलविण्यात येईल.

**अध्यक्ष**

**शोध समिती**